N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** कुडाळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0049 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/03/2024 22:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 01/03/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/03/2024

**Time From (वेळेपासून):** 11:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/03/2024 **Time (वेळ):** 22:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/03/2024 22:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वनपाल यांचे कार्यालय, नेरूर तर्फे हवेली,कुडाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** चंद्रकांत सखाराम मराठे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घावनाळे,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घावनाळे,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9404776148

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल हिरामन राठोड | | | 1. सावंत अपार्टमेंट,खरयेवाडी, ओरोस,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटांचे एकून 8 | 340,590.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | बंडल असून त्यामध्ये 500 रू. दराच्या एकूण 681 भारतीय चलनी नोटा, 20 रू. दरा | |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | मेमरी कार्ड क्र.KDM MICRO SD HC 4 GB TC585D3HSA41CC12CC 15 MADE IN TAIWAN | 350.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | अँथ्रासिन पावडर लागलेली गॅबॉन जिन्स | 200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

356,140.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

माझे नाव चंद्रकांत सखाराम मराठे, वय-40 वर्षे, लाकुड व्यावसायिक, राह, घावनळे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, मोबाईल क. 9404776148 समक्ष जबाब देतो की,मी लाकुड व्यावसायिक असुन शेतक-यांकडुन जंगल विकत घेवुन झाडे तोडुन त्याची वाहतुक करतो. मी मौजे तुळसुली कर्याद नारुर गावातील श्रीमती सुहासिनी चव्हाण यांच्या मालकीचे सर्व्हे नंबर 97/1कक मधील जमिनीतील लाकुडतोड व लाकुड वाहतुकीचे कुलमुखत्यापत्र व संमतीपत्र घेवुन लाकुड पास कामाचे प्रकरण फॉरेस्ट ऑफीस नेरूर येथे दि. 15/02/2024 रोजी दाखल केलेले होते. सदर ऑफीसचे अधिकारी श्री. राठोड, वनपाल हे लाकुड तोडीचे प्रकरण व पास काम करून देण्यासाठी माझेकडे 20,000/- रू. ची मागणी करीत असल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेकरीता मी माझे परिचयाचे अँन्टी करप्शन विभागाचे पोलीस हवालदार श्री, रेवंडकर यांचेशी दिनांक 29/02/2024 रोजी दुपारी 14.39 वाजता फोनद्वारे संपर्क साधुन माझे वरीलप्रमाणे तकारीची हकीगत सांगितली. त्यावेळी पोहवा/रेवंडकर यांनी मला सायंकाळी 16.00 वा. चे दरम्याने एम.आय.डी.सी जॅकवेल, श्रीरामवाडी कुडाळ येथे येण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिनांक 29/02/2024 रोजी दुपारी 16.00 वा. सदर ठिकाणी जावून पोहवा/रेवंडकर व त्यांचे सोबत असलेले ला.प्र.वि. कर्मचारी पोकों/पोतनीस यांची भेट घेतली. दिनांक 29/02/2024 रोजी दुपारी 16.00 वा. मी व पोहवा/रेवंडकर असे एम.आय.डी.सी जॅकवेल, श्रीरामवाडी कुडाळ येथे थांबलो असता सुमारे 16.25 वा. चे दरम्याने पोलीस उपअधीक्षक श्री. पवार हे शासकीय सुमो वाहनाने पोनि/श्री. पाटील, दोन शासकीय पंच व त्यांचे कार्यालयीन स्टाफ सोबत सदर ठिकाणी आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी माझी, पंच व ला.प्र.वि अधिकारी/ कर्मचारी यांचेशी आपापसात ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी सापळा पथक व पंचांस माझे तकारीबाबत थोडक्यात हकिगत सांगणेस सांगीतली असता मी वरीलप्रमाणे वनपाल श्री. राठोड यांचेविरूध्दच्या तक्रारीची हकीगत सांगितली. त्यानंतर पोनि/पाटील यांचे सुचनेवरून मी दोन्ही पंचांसमक्ष माझी तकार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. तकारीवर पंच व पोनि/पाटील यांनी स्वाक्षरी केली व पोनि/श्री. पाटील यांनी सदरची तकार आपल्या ताब्यात ठेवली.पोनि.श्री. पाटील यांनी वनपाल राठोड यांची वनपाल कार्यालय नेरूर येथे लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/पाटील यांनी यांचे सुचनेवरून पोकों/पोतनीस यांनी सोबत आणलेल्या साहीत्यामधुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व कंपनी पॅक मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याबाबत सविस्तर माहीती दिली. पोनि/पाटील यांचे सुचनेवरुन पोकों/पोतनीस यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन सापळा कारवाईच्या अनुषंगाने पोनि/श्री. पाटील, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि/पाटील यांचे सुचनेवरून पोकों/पोतनीस यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवला.



Scanned with OKEN Scanner

त्यांनतर मी व पंच क.1 श्री. चौगले असे माझे स्विफ्ट डिझायर वाहन क. MH07 AB 2148 ने वनपाल कार्यालय, नेरूर येथे गेलो. लोकसेवक राठोड यांना संशय येवु नये या करीता मी पंच श्री. चौगले यांना हाताच्या इशा-याने बाहेरच थांबण्यास सांगुन मी कार्यालयात जावून लोकसेवक राठोड यांची भेट घेवुन माझ्या पासच्या कामाचे काय झाले असे विचारले असता, लोकसेवक राठोड यांनी तुम्हाला एवढे आमच्या जबाबदारीवर पास वाढवुन दिले, तुमच्या इच्छेनुसार काय ते द्या असे सांगितले. त्यावेळी मी लोकसेवक राठोड यांना काय करू असे विचारले असता लोकसेवक यांनी मला सुरूवातीस एका कामाचे वीस, वीस च्या ठिकाणी पंधरा द्या, पंधराच्या एवजी तुम्हाला म्हणुन दहा असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पंधरा हजार खुप होतात असे सांगितले असता त्यांनी दहा द्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना दहा हजार का? असे विचारले असता ते होय असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पासाचे दहा आणि प्रकरणाचे काय? असे विचारले असता त्यांनी प्रकरणाचे दहा आणि पासाचे दहा असे मिळून दहा दहा वीस हजार द्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना लाकडाला गि-हाईक नाही, यंदा मी लॉस मध्ये आहे, वीस हजार देणे मला परवडणार नाही असे सांगितले असता त्यांनी तडजोडीअंती मला पंधरा हजार रू. देण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांना उदया देतो, उदया फोन करतो असे सांगितले असता त्यांनी होय ये असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला लाकडाचा माल कोठे आहे असे विचारले असता मी मला जाग्यावरचे असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 श्री. चौगले असे माझे वाहनाने निघुन सापळा पथकाजवळ आलो. त्यावेळी पोकों/पोतनीस यांनी माझेकडील रेकॉर्डर आपले ताब्यात घेवुन बंद केला.पोनि/पाटील यांनी मला लोकसेवक राठोड यांचे भेटी दरम्यान घडलेली हकीगत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीगत सांगितली. त्यानंतर पोकों/पोतनीस यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू केला. त्यावेळी पोनि/पाटील व पंचांनी संभाषण ऐकले असता, बघा काय असेल तर दया...तुमची इच्छा आहे ती... तुम्हाला एवढं वाढवून दिलं फक्त आम्ही दोन पास... दोन पासमध्ये आमचं आणि पास वाढवून आमच्या जबाबदारीने आम्ही वाढवतो... दोनचे किती खर्च येतो तुम्हाला सांगा... किती खर्च येतो दोन पासांचा...दोन किंवा तीन लाख खर्च येतो...वीसच्या ठिकाणी पंधरारा... पंधराच्या ठिकाणी दहा असं कायतरी दयायचं ना... वीसच्या ठिकाणी पंधरा दयायचे.... असे सांगुन सुरूवातीस वीस हजार व तडजोडीअंती पंधरा हजार घेवुन येण्यास सांगितले असल्याचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन आढळुन आले. त्यानंतर आंम्ही सर्वजण ला.प्र.वि कुडाळ कार्यालयात येवुन दि 29/02/2024 रोजीच्या पडताळणी पंचनाम्याची पुढील कार्यवाही पूर्ण केली. त्यानंतर पोनि/पाटील यांनी लोकसेवक राठोड यांचेविरूध्द दि. 01/03/2024 रोजी सापळा कार्यवाही आजमाविणार असल्याचेसांगुन तश्या सर्वांना सुचना दिल्या.पोनि/पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी आज दि. 01/03/2024 रोजी 10.20 वा. चे सुमारास माझे स्विफ्ट डिझायर वाहन क. MH07-AB-2148 ने हजर झालो. त्यावेळी पोनि/पाटील हे पंच व सापळा पचकसोबत तेथे हजर होते. पोनि/पाटील यांचे सुचनेवरून दोन्ही पंच, पोना/पेडेणकर व मी असे शासकीय वाहनात बसल्यानंतर 15,000/- रू रक्कमेच्या अँन्थ्रासिन नोटांना पावडर लावणे, अँन्थ्रासिन पावडर प्रात्तक्षिक सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. अमितकुमार पाटील यांनी मला, पचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोकों/पोतनीस यांना व्हॉईस रेकॉर्डर द्वारे वक्तव्ये ध्वनीमुद्रीत करण्यात सांगितली त्याप्रमाणे त्यांनी वक्तव्ये ध्वनीमुद्रीत केली. लोकसेवक राठोड यांना कॉल करून येतो असे सांगितल्याने पोनि/पाटील यांचे सुचनेवरून मी लोकसेवक राठोड यांना कॉल केला, त्यावेळी लोकसेवक राठोड यांनी कार्यालयात असल्याचे सांगितले. लोकसेवक हे कार्यालयात हजर असल्याने त्वरीत सापळा कारवाई आजमाविण्याचे पोनि/पाटील यांनी निश्चीत केले. पोनि/पाटील यांचे सुचनेवरून पोकों/पोतनीस यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टच्या समोरील डाव्या जुच्या खिश्यात लपवुन ठेवला. त्यानंतर मी पंच कमांक 1 श्री. चौगले असे माझे मारुती स्विफ्ट वाहनाने लोकसेवक राठोड यांना लाचेची रक्कम देणेसाठी वनपाल कार्यालय, नेरूर येथे गेलो. आमचे पाठोपाठ ला.प्र.विभागाचे सापळा पथक हे शासकीय सुमो वाहनाने तसेच दुचाकी वाहनाने नेरूर वनपाल कार्यालयाच्या आजुबाजुच्या परिसरात थांबुन राहीले. मी वाहनातुन उतरून वनपाल नेरूर कार्यालयात जात असताना लोकसेवक राठोड हे कार्यालयाबाहेरच दिसल्याने मी पंच श्री. चौगले यांना हाताच्या इशा-याने बाहेरच थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी वनपाल कार्यालयात निघुन गेलो. काही वेळाने तक्रारदार श्री. मराठे हे वनपाल, नेरूर कार्यालयातुन बाहेर आले. त्यावेळी मी त्यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला घाईत का असे विचारून कार्यालयाबाहेरील रस्त्यावर कोणी आहे अगर कसे याबाबत संशयास्पद पाहणी केली व माझेशी अवांतर चर्चा करण्यास सुरूवात केली. त्यावेळी मी त्यांना तुमचे पैसे आणलेत नाहीतर तुम्ही फोन करत राहणार असे सांगितले. त्यावेळी त्यांनी आपला उजवा हात पुढे केला असता मी लाच रक्कम रू. 15,000/- माझे पॅन्टच्या समारील उजव्या खिशातुन बाहेर काढुन लोकसेवक राठोड यांचे समोर धरली असता त्यांना लाच रक्कम स्विकारून आपल्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली, त्यानंतर मी कार्यालयाबाहरे येवुन माझे खिशातील हातरूमाल बाहेर काढुन तो चेह-यावरून वारंवार फिरवुन लोकसेवक राठोड यांनी लाच रक्कम



Scanned with OKEN Scanner

स्विकारलेबाबतचा सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथक वनपाल नेरूर कार्यालयाच्या दिशेने येते असता, लोकसेवक राठोड हे कार्यालयाच्या पाठीमागील बाजुने जंगलात धावत गेले. त्यावेळी सापळा पथक व पंचांनी त्यांचे पाठोपाठ धाव घेतली व त्यांना वनपाल नेरूर कार्यालयाच्या पाठीमागील जंगलात लाच रक्कमेसह रंगेहाथ पकडले.अशा रितीने लोकसेवक श्री. अनिल हिरामन राठोड, वनपाल नेरूर तर्फ हवेली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांनी मौजे तुळसुली कर्याद नारुर येथील सर्व्हे नंबर 97/1 कक मधील जमिनीतील लाकुडतोड प्रकरण व लाकुड वाहतुकीचा पास देणेकरीता माझेकडे दि. 29/02/2024 रोजी 20,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 15,000/- रू. घेवुन येण्यास सांगुन सदरची लाच रक्कम आज दि. 01/03/2024 रोजी स्विकारलेवरून त्यांना ला.प्र.विभागाने 11.43 वा. पकडल्याने माझी लोकसेवक श्री. अनिल हिरामन राठोड, वनपाल नेरूर तर्फ हवेली यांचेविरूध्द कायदेशीर तकार आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

runal sujauddin mulla(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**
C S Marathe
चंद्रकांत सखाराम मराठे

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
जि सिंधुदुर्ग

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** runal sujauddin mull
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi



Scanned with OKEN Scanner